एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

(स्वयं अर्थसहाय्यित)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय

आयोजक


## मराठी विभाग

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी (कॅम्प) द्वारा संचलीत

(भाषिक अल्पसंख्यांक (मारवाडी) दर्जा प्राप्त)

## तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सेनगांव जि. हिंगोली (महाराष्ट्र) - ४३१५४२




संयोजक

प्रा. डॉ. अंजली. द. टापरे

मराठी विभाग

समन्वयक

प्रा.उत्तम. पुं. सुपारे

मराठी विभाग प्रमुख

प्रा.श्रीपाद. ग. तळणीकर

प्र. प्राचार्य

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण : भाषा, साहित्य आणि संस्कृती | प्रा.डॉ.मा. मा. जाधव | 9 |
| 2 | जागतिकिकरण आणि मराठी कविता : एक आकलन | प्रा. डॉ. बी. बी. खंदारे | 12 |
| 3 | जगतिकीकरणात मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, | 15 |
| 4 | मराठवाडी.बोली अभ्यासाच्या दिशा | डॉ. विठ्ठल जंबाले | 21 |
| 5 | बदलत्या काळातील बोलीभाषा : आव्हाणे व उपाय | डॉ. वैजनाथ अनमुलवाड, | 23 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ.रेखा जगनाळे, | 27 |
| 7 | जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय | अस्मिता विश्वनाथ वांद्रे. | 34 |
| 8 | जागतिकीकरणाच्या युगात मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास | डॉ. शामसुंदर गुळभिले | 41 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | डॉ. सपना वाल्मीक सोनवणे | 50 |
| 10 | जागतिकीकरणाच्या वावटळीतील बलुतेदाराची व्यथा | | |
| 11 | मांडणारा कवी : अरुण काळे | प्रा.डॉ. यशपाल भिंगे | 53 |
| 12 | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव | प्रा. डॉ. डिगोळे विठ्ठलराव | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि नव्वदीनंतरची मराठी कविता।। | डॉ. केशव पाटील | 59 |
| 14 | जागतिकीकरणानंतरच्या शैक्षणिक पडझडीची कविता : पोरगं शेकत बसलंय | प्रा.डॉ.संजय कसाब, | 65 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 69 |
| 17 | जागतिकीकरण : मराठी भाषेची स्थिती, आव्हाने व उपाय | डॉ.रामकिशन नारायण दहिफळे | 72 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने | 75 |
| 19 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.सुरेश शिंदे | 79 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ. राजेश धनजकर | 82 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. डॉ. मुंढे संगीता | 85 |
| 22 | मराठी भाषेची सद्यःस्थिती आव्हाने आणि उपाय | प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे | 88 |
| 23 | जगतिकीकरण आणि आदिवासी लोकसाहित्य | प्रा. डॉ. पंडित शिंदे | 90 |
| 24 | 'तुडवण ' आणि शोषणाचे जागतिकीकरण | प्रा.डॉ. राम रौनेकर, | 94 |
| 25 | जागतिकीकरण आणि कादंबरी | प्रा.डॉ. पंडित रानमाळ, | 96 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ.प्रभाकर ना. कऱ्हाळे | 98 |
| 27 | जागतिकीकरणाच्या पाश्वभूमीवर बदलती महानगरीय मराठी कविता | प्रा.डॉ. जगताप यु. एस. | 101 |
| 28 | जागतिकिकरणाचे संदर्भ अचुकपणे टिपणारी कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल': एक आकलन | प्रा. डॉ. शारदा कदम . डॉ. कविता लोहाळे | 104 |
| 29 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर, | 107 |
| 30 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा. डॉ. गणपती मोरे | 111 |
| 31 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ.एल.डी.गलंडे | 113 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.कालीदास गुडदे | 116 |
| 33 | जागतिकीकरणआणिमराठीसाहित्य | प्रा. इंगळे के.एस. | 118 |
| 34 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ.शंकर विभुते | 123 |
| 35 | जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावरील कृषी जाणीवा | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | 125 |
| 36 | 2000 नंतरची मराठी ग्रामिण कादंबरी : एक अभ्यास | प्रा.कृष्णा काशिराम कोटकर | 128 |
| 37 | जागतिकीकरण आणि दलित कविता : एक अभ्यास | प्रा. मारोती गायकवाड | 132 |
| 38 | मराठी भाषेची सद्यःस्थिती, आव्हाने व उपाय नेहा | रतन बनसोडे | 137 |

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्या पुढील आव्हाने व उपाय

संपादक

**प्रा.यु.पी. सुपारे**

**मराठी विभाग प्रमुख**

**✻ प्रकाशक ✻**

प्र.प्राचार्य प्रा.एस.जी. तळणीकर

तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव

जि.हिंगोली

फोन : (०२४५६) २०२४६५, २५०४६२

www.toshniwalacs.com | E-mail : prin.taccs212@rediffmail.com

प्रथम आवत्ती : ०४ जानेवारी २०२०

ISBN : 978-1-79482-974-9

**✻ मुद्रक ✻**

महेश ऑफसेट, परभणी

मूल्य : २५०/-

या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिल परवानगी ग्राह्य धरूनच हे शोधनिंबंध एकत्रित करण्यात आले असून, त्या मतांशी संपादक व प्रकाशनक सहमत असतीलच असे नाही.

या पुस्तकाचे सर्व अधिकार प्रकाशनाधीन असून या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नक्कल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटो कॉपी, रेकॉर्डींग करणे कायद्याने गुन्हा असून असे आढळून आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल.

# जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य

**प्रा.डॉ. राजेश धनजकर**
मराठी विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महा. गंगाखेड, जि. परभणी

---

1991 नंतर भारतात जागतिकीकरणास सुरुवात झाली. जागतिकीकरण ही एक आर्थिक संकल्पना असल्यामुळे तिचा प्रभाव आज सर्व क्षेत्रावर पडलेला दिसतो. तसं पाहिलं तर, सध्याचं युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाच युग आहे. रोज नवनवीन शोध लागत आहेत. त्यामुळे जगाचे अंतर कमी झाले. साहजिकच लोकांमधील संपर्क अधिक वाढला. आज मानवाच्या मूलभूत गरजा भागविण्याची जबाबदारी जरी विज्ञानाने पार पाडली असली, तरी त्या गरजेतून मात्र तीव्र अशा प्रकारची स्पर्धा वाढली. जागतिकीकरणाचा जसा वस्तुशी संबंध आला, तसाच तो माणसाच्या दैनंदिन जीवनाशी, त्याच्या संस्कृतीशी, भाषा, कला व साहित्याशीदेखील आला.

अलीकडच्या काळात व्यक्तिच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कषतिक क्षेत्रावरही जागतिकीकरणाचे विपरीत परिणाम दिसू लागले. भारतासारख्या विकसनशील (आज भारत विकसनशील देशाच्या यादीतही नाही) देशाने तर खुली अर्थव्यवस्था, उदारीकरण, सेझ व जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले. त्यामुळे माणसांचे आता यांत्रिकीकरण झाले. यंत्रासारखा तो आता वागू लागला. जस जसा काळ बदलत चालला, तसा माणसाचा स्वभाव व त्याची वष्त्ती–प्रवष्त्तीही बदलत चालली. चांगूलपणा, त्याग, आपुलकी, जिव्हाळा, प्रेम, दुसऱ्याचं भलेपण आदिंची जागा आता भोगवादी व चंगळवादी दुनियेने घेतली. याचा परिणाम माणसा–माणसांमधील प्रेमाच्या नद्या आटण्यात झाला. माणसाच्या माणूसकीपेक्षा नफेखोरीला अधिक ऊत आला. त्यामुळे माणसांमध्ये जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. याचा सर्वाधिक फटका मानवी मूल्यांना, श्रद्धा आणि भावनेला बसला.

अर्ज जागतिकीकरणामुळे संपतीचा संचय अमाप वाढला. श्रीमंत तो अधिकच श्रीमंत आणि गरीब हा अधिकच गरीब होत चालला. समाज जीवनातली श्रीमंत–गरीब दरी कमी होण्याऐवजी ती वाढतच चालली. यायाच अर्थ असा की, जागतिकीकरण हे भारतातील बहुसंख्य गरिबांसाठी फारसे उपयुक्त ठरलेले नाही. दारिद्रय निर्मूलन व बेकारी कमी करण्यात त्याला अपयष आले. एवढेच काय, आजच्या जागतिकीकरणाने समाजा–समाजात व व्यक्ती–व्यक्तित प्रचंड आर्थिक विशमता निर्माण केली. भांडवलदार वर्गाने तर या देशातील प्रत्येक माणसाला रेसचा घोडा बनविले. गरजांच्या व चैनिंच्या वस्तुंसाठी तो रात्र–दिवस धावताना दिसत आहे. "आजचे जागतिकीकरण हे माणसाच्या माणूस म्हणून असलेल्या गरजांचा विचारच करीत नाही. उलट त्याने माणसाला चंगळवादी बनवून त्याच्यावर अनेक कष्त्रिम गरजांचा मारा केला आहे. त्या गरजा पूर्ण करण्याचे त्याला व्यसन जडले आहे."[1]

अषा या चंगळवादाच्या भोवऱ्यात आज सामान्य माणूस अडकून पडला. उत्पादक वर्ग मात्र तिकडे ग्राहक आकर्षित होईल, अशा नाना क्लष्त्या वापरून वस्तुंची निर्मिती करू लागला. त्यातूनच चंगळवादाचं पेव फुटलं. डॉ. माधव बसवंते यांनी जागतिकीकरणाची केलेली व्याख्या या संदर्भात महत्त्वाची वाटते. ते म्हणतात, "चंगळवादी जीवनालाच प्रतिष्ठित संस्कष्ती बनविण्याचा केविलवाणा प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय."[2]
भारत हा विविधतेने नटलेला देश. इथे अनेक जाती धर्मांचे, पंथाचे, संस्कष्तीचे व बोलीभाषेचे लोक गुण्यागोविंदाने नांदतात. निसर्गाच्या भिन्नतेमुळे भौगोलिक वेगळेपण प्रत्येकाच्या वाटयाला आले. त्यामुळे त्या त्या प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या लोकांची एक विशिष्ठ संस्कष्ती उदयाला आली. हजारो वर्ष या निसर्गाचा सखा असलेला व नैसर्गिक जीवन जगणारा आदिवासी समाज त्यांचीही एक मानवी मूल्याने युक्त अषी संस्कष्ती होती, अजूनही आहे.

नगर संस्कष्तीपासून दूर व अलिप्त असलेले त्या त्या प्रदेशातील मूळ रहिवाशी म्हणजे आदिवासी होत. महाराष्ट्रात आज आदिवासी जमातीची संख्या 45 इतकी आहे. त्यात आंध, गोंड, भिल्ल, परधान, वारली, कोलाम, कातकरी, महादेव कोळी, माडिया, कोकणा अशा काही जमाती येतात. खरं तर, निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासींच्या जीवनात पूर्वी कुणालाच हस्तक्षेप नव्हता. सुखी आणि समाधानाने तो निसर्गाच्या कुशीत आनंदी जीवन जगत होता. वस्तुची साठवण करणे किंवा उदयाची चिंता वाहणे हे आदिवासींच्या गणितात बसत नव्हते. कारण

निसर्गातून त्याला त्याच्या गरजेच्या वस्तू सहजच प्राप्त व्हायच्या. परंतु आज जागतिकीकरणाचं वारं आदिवासींच्या जंगल जिव्हाऱ्यापर्यंत पोहोचलं. याचा परिणाम त्यांच्या सांस्कृतिक मूल्यांवर झाला. कळत न कळत बाह्य संस्कष्तीचं आक्रमण आदिमांच्या संस्कृतीवर झपाट्याने होताना दिसते आणि म्हणूनच जागतिकीकरणामुळे आदिवासी जीवनाची वाताहात होऊ लागली.

''आदिवासींची जीवनमूल्य, कलामूल्ये, संस्कृती, त्यांची भाषा, साहित्य या सर्वांचीच हानी होत आहे. त्यांची एकेकाळची चित्रशिल्पे आताच्या आधुनिक काळात दिवाणखान्यात केवळ देखाव्यापुरती बंदिस्त होत आहेत.''[3] वारली चित्रकार जिव्या सोमा मसे असो अथवा सूर्यभान नागभिडे असो, यांच्या बहुतांश कलाकष्ती या दिवाणखान्यात शोभेच्या वस्तू बनल्या आहेत.

पूर्वी आदिवासींच्या ताब्यात अख्खी जंगलं होती. जल, जंगल व जमिनीवर पहिला अधिकार त्यांचाच होता. या जंगलाचा खरा मालक व रक्षक तोच. त्यातील पशू–पक्षी हे त्यांचे सगेसोयरे. असा हा जंगलाचा राजा आनंदी जीवन जगत असताना, जागतिकीकरणाने मात्र विकासाच्या नावाखाली त्याची जंगले आपल्या ताब्यात घेतली. त्या ठिकाणी 'अभयारण्ये' उभारून पर्यटन स्थळांचा विकास केला. अर्धनग्न कपडे परिधान केलेल्यांचे इथे लोंढेच्या लोंढे येऊ लागले. त्यातून त्यांना अमाप संपती मिळू लागली. आदिवासी मात्र तिकडे देशोधडीला लागला. जंगलावरचा ताबा गेल्यामुळे पशू–पक्षांशी असलेलं जिव्हाळ्याचं नातही संपुष्टात आलं. नैसर्गिक जीवन जगण्याची त्यांची रीतच पार कोलमडून पडली. हा परिणाम केवळ जागतिकीकरणाचा आहे.

आदिवासींच्या वाड्या–पाड्यापर्यंत रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, ह्या सारख्या मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत असला, तरी जागतिकीकरणाने मात्र त्या ठिकाणी मोबाईल व डिशचा ॲन्टीना त्यांच्या झोपडीवर उभा केला. अजूनही तिथे शुध्द पाण्याचा सुकाळ नसला, तरी 'बिसलेरी' मात्र तिथपर्यंत जाऊन पोहोचली. आदिवासींच्या वाडी–वस्तीवर शाळांची उभारणी झाली, पण मुलांच्या हातात पुस्तक नाही. त्यामुळे त्याचं मस्तक रिकामं राहू लागलं. पर्यायाने तो षाळेपासून दुरावत चालला. शाळांचा दर्जा म्हणावा तर तोही खालावलेलाच. या व अशा अनेक प्रश्नांच्या मुळाशी आदिवासी साहित्यिक गेला पाहिजे ''जागतिकीकरणाच्या बाबतीत आदिवासी साहित्याने पहिल्यांदा स्वतःचे अस्तित्व निर्माण करावे, इतरांची नक्कल न करता स्वतःचा अनुभव, स्वतःची भाषा आणि स्वतःचे विचार साहित्यातून मांडावे''[4].

तसं पाहिलं तर, आदिवासी साहित्याला फार प्राचीन अशी मौखिक परंपरा आहे. आज ज्याला आपण लोकसाहित्य म्हणतो. त्या लोकसाहित्याचा पहिला हुंकार आदिवासींच्या मुखातून बाहेर पडला आणि म्हणूनच लोकसाहित्याचे उद्‌गाते व खरे वारसदार तेच होत. सण, उत्सव, देव–देवता, रूढी, प्रथा, परंपरा, उखाणे, म्हणी, वाक्यप्रचार आदिंना अनेक वर्षाची परंपरा आहे. हे झालं मौखिक साहित्याच्या संदर्भात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासी समाजात कमी अधिक प्रमाणात शिक्षणाचा प्रसार झाला. 1970–80 च्या दशकात जेव्हा आदिवासी साहित्य निर्मितीस प्रारंभ झाला, तेंव्हा इतर साहित्य प्रवाहाच्या तुलनेत आदिवासी साहित्याकडे नवखा साहित्यप्रकारच म्हणून पाहिले जात होते.

आदिवासी समाज व त्यांची संस्कष्ती, त्याचं दुःख, कष्ठ, मेहनत, सण–समारंभ आदी अंगाने सुरूवातीच्या काळात लेखन केले जात होते. परंतु अलीकडे आदिवासी साहित्याच्या कक्षा रूंदावत आहेत. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र यासारखे वाड्‌मयप्रकार बहरू लागले. समाजातल्या अनंत समस्यांवर आदिवासी कविता आता तुटून पडताना दिसत आहे. तिनं समाजाला न्याहाळायला सुरूवात केली आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, कुपोषण, भूक, भाकर, दारिद्रय, शोषण, अन्याय, अत्याचार हे विषय अलीकडे त्यांच्या कथा व कवितांचे झाले आहेत.

डॉ. विनायक तुमराम, बाबाराव मडावी, डॉ संजय लोहकरे, डॉ. सखाराम डाखोरे, डॉ. तुकाराम रोंगटे, वाहरू सोनवणे, उषाकिरण आत्राम, पी.डी. आत्राम, प्राचार्य मोतीराम देशमुख आदिंचं योगदान या संदर्भात फार महत्त्वाचं आहे. 'माणूस' हा साहित्याचा केंद्रबिंदू माणूनच या मंडळींनी साहित्य लेखन केले, अजूनही करत आहेत. अलीकडच्या पाच–दहा वर्षात आदिवासी समाजातील नवतरूण लेखक व कवी हा स्वतंत्र प्रतिभा सामर्थ्याने व आत्मविष्वासाने लिहू लागला. यात पांडुरंग वागतकर, सोपान भुरके, डी.एम. धनवे, शीतल ढगे अशी काही नावे पुढे येत आहेत. मुळात षहरी संस्कृतीपेक्षा वेगळी असलेली आदिवासीची संस्कृती, हिंदू धर्मापेक्षा आदिमांचा वेगळा धर्म, आदिवासी क्रांतिकारकांचा गौरवशाली इतिहास व समाजाच्या व्यथा वेदनांना तो आता प्रखरतेने आपल्या साहित्यातून मांडू

लागला. अनेक लेखकांनी 'स्व–बोलीतून' साहित्य निर्मिती केली. आदिवासीचं जंगणं व भोगणं तो तेवढ्याच पोटतिडकीने मांडू लागला. आदिवासी साहित्याच्या संदर्भात डॉ. विनायक तुमराम यांची प्रतिकीय अतिशय बोलकी आहे. ते म्हणतात, "आदिवासी साहित्य हे इतर कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही, ते स्वतंत्र, स्वयंभू व स्वयंसिध्द आहे. आदिवासी साहित्य हे देशातील नव्हे, तर अखिल विश्वातील मूळ मानवसमूहांचे व टोळ्यांचे सांस्कृतिक मूल्यांनी नटलेले नवे–जुने व्यापक साहित्य आहे."[5] अशा या साहित्याची मूळ प्रेरणाच ही नैसर्गिक आहे. ती कोणत्याही साहित्याची उसणवारी किंवा भागीदारी देखील नाही.

आदिवासींच्या साहित्यकष्तीत अलीकडच्या काळात व्यथेबरोबरच त्यांच्या वेदना, नकार, विद्रोह, बंड, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मानवी मूल्यांबरोबरच वैज्ञानिक दष्टीकोनही येऊ लागला. समाजाला परिवर्तनवादी विचारांचं खाद्य कथा–कवितेतून मिळू लागलं. थोडंफार समाजाचं संघटनही होत आहे. 'स्व' चा शोध आता तो प्राचीन इतिहासात घेऊ लागला. त्यांचीही अस्मिता जागी झाली. आणि म्हणूनच मराठी साहित्य विश्वात आदिवासी साहित्य हे उठून दिसत आहे. त्यांचीही आता 'अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलने' भरू लागली. आज पर्यंत अषी एकूण नऊ साहित्य संमेलने झाली. चर्चासत्र व परिषदांमध्येही "आदिवासी साहित्या" वर स्वतंत्र चर्चा होताना दिसत आहे, ही एक समाधानाची बाब आहे.

हे जरी सगळं खरं असलं, तरी जागतिकीकरणाच्या विळख्यात व कचाट्यात आदिवासी संस्कृती कशी टिकवून ठेवता येईल, यासाठीचे प्रयत्न होणे गरजेचे आहेत. कारण की, आदिवासींचा आज बाह्य जगाषी इतका संपर्क वाढला की, आज तो स्वतःच अस्तित्वच हरवून बसतो की काय अशी षंका येऊ लागली. कारण इतर धर्माचं व संस्कृतीचं तो आता बिनबोभाट अनुकरण करू लागला. हिंदुचे अर्ध्य देव तर त्यांच्या देव्हाऱ्यावर ठाण मांडून बसले आहेत. शिकल्या–सवरलेल्या कमी अधिक लोकांना स्वतःची भाषादेखील परकी वाटू लागली. सुशिक्षित वर्गाला 'स्व संस्कृती' व 'स्व धर्मा' बद्दल कमीपणा वाटू लागला.

या सर्व महाजंजाळातून आदिवासी समाजाला बाहेर काढण्यासाठी आदिवासी साहित्यिकांनी आता आपली लेखनी झिजवली पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण विकासाला प्रेरक ठरतील अशा कथा, कविता, कादंबऱ्या, नाटके व आत्मचरित्रे लिहिले पाहिजेत. यातूनच समाजाच्या खालच्या स्तरात नवा विचार व नवा दृष्टिकोन रूजेल. साहित्यातून समाजाला वैचारिक बळ मिळेल, असे साहित्य निर्माण होणे गरजेचे आहे. तेव्हाच जागतिकीकरणाच्या या झगमगाटात आदिवासी माणूस व त्याचे साहित्य टिकून राहील असे वाटते.

**संदर्भ :–**


1. रावसाहेब कसबे 'जागतिकीकरण : स्वरूप आणि भवितव्य, सुमेध प्रकाशन, पुणे –2010, पृ. 51.
2. डॉ.शेषराव नाईकवाडे 'जागतिकीकरण समकालीन बदलते संदर्भ' अलंकार प्रकाशन, उमरी – 2012, पृ. 185.
3. डॉ. शत्रुघ्न फड 'आदिवासी साहित्य आणि लोककला' 2012, पृ. 16.
4. तत्रैव, पृ. 47
5. डॉ. शिवदास शिरसाठ 'जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य' (स्मरणिका) 2015, पृ.29.